-: प्रेसनोट दिनांक - १३/०५/२०२५ :-

**आरोपी लोकसेवक प्रशांत ताराचंदजी राठी, वय - ४९ वर्षे, व्यवसाय - नोकरी पद - कार्यकारी अभियंता, वर्ग - १, महावितरण विभागीय कार्यालय, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर सद्या रा. उपकार रेसीडेन्सी प्लॅट नंबर ०६, बिग बझार जवळ सांगली रोड इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर मुळ रा. धामनगाव, ता. धामनगाव, जि.अमरावती यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

यातील तक्रारदार हे इलेक्ट्रीक कॉन्ट्रक्टर असुन ते इलेक्ट्रीक फिटींगची कामे घेत असतात. त्यांनी इचलकरंजी येथील एका अर्पाटमेंट मधील १८ फ्लेटचे विज जोडणीचा ठेका संबधीत मालकाकडून घेतलेला होता. विज जोडणी मंजुरी करीता लागणार अर्ज व अवाश्यक ती कागदपत्र जोडून तक्रारदार यांनी महारा ट्र विद्युत वितरण कंपनी उपविभाग, इचलकरंजी येथे दिलेला होता. सदरचा अर्ज मंजुर होणेसाठी तक्रारदार हे कार्यकारी अभियंता प्रशांत राठी यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांचेकडे १८ फ्लेटचे प्रत्येकी ५०००/- प्रमाणे एकुण ९००००/- रु दयावे लागतील तरच प्रकरण मंजुर होईल असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे ९०,०००/- रूपये लाचेची मागणी केली होती. त्यानंतर तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे तक्रार दिलेली होती.

तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये तक्रारदार यांचेकडे कार्यकारी अभियंता प्रशांत राठी यांनी तक्रारदार यांचेकडे मागणी केलेल्या ९०,०००/- रूपयांच्या लाच मागणीस दुजोरा देवुन तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती ३०,०००/- रूपयांची लाच मागणी केलेचे निष्पन्न झाले. त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष कार्यकारी अभियंता प्रशांत राठी यांनी मागणी केलेप्रमाणे ३०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना पकडणेत आले.

सदरबाबत आरोपी प्रशांत ताराचंदजी राठी, वय - ४९ वर्षे, व्यवसाय - नोकरी पद - कार्यकारी अभियंता, वर्ग - १, महावितरण विभागीय कार्यालय, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर सद्या रा. उपकार रेसीडेन्सी प्लॅट नंबर ०६, बिग बझार जवळ सांगली रोड इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर मुळ रा. धामनगाव, ता. धामनगाव, जि.अमरावती यांचेविरूध्द शिवाजीनगर पोलीस ठाणे, इचलकरंजी, जि.कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक, स.पो.फौ.प्रकाश भंडारे, पो.हे.कॉ. विकास माने, पो.हे.कॉ.संदिप काशीद, पो.ना. सचिन पाटील, पो.कॉ. उदय पाटील, चालक स.पो.फौ. गजानन कुराडे, चा.पो.कॉ. प्रशांत दावणे, ला.प्र.वि.कोल्हापूर अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७. कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४. ५) व्हॉटस अप क्रमांक :- ७८७५३३३३३३.